लोकमत कोकण, मंगळवार, दि. ३ मार्च २०१५

# मराठी भाषेचा प्रचार, प्रसार आवश्यक

## 'मराठी भाषा गौरव दिन' कार्यक्रमात व्ही. ए. पाटील यांचे प्रतिपादन

**कसई दोडामार्ग :** मल्याळम, तेलगू, कन्नड, तामिळ, आदी भाषांना अभिजात भाषा म्हणून दर्जा मिळाला आहे. पण, मराठीला आजपर्यंत हा दर्जा न मिळण्यात मराठी भाषेविषयी असलेली अनास्था कारणीभूत आहे. नामदेवांनी जसा मराठी भाषेचा प्रसार पंजाबपर्यंत केला, त्याचप्रमाणे आपणही मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले.

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात शनिवारी आयोजित केलेल्या 'मराठी भाषा गौरव दिन' या कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रथम वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांनी आयोजनाची जबाबदारी स्वीकारलेल्या या गौरव दिन समारोहात प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, कळणे मुक्तद्वार ग्रंथालयाचे हरिश्चंद्र भिसे व निवृत्त मुख्याध्यापक हनुमंत महाबळ, प्रा. दिलीप बर्वे उपस्थित होते.

मराठी भाषा व वाङ्मय मंडळामार्फत आयोजित केलेल्या भाषा दिनाने 'मराठी ज्ञानभाषा कशी होईल' या विषयावरील निबंध स्पर्धा, मराठी गौरव गीत गायन स्पर्धा, रांगोळी, पोस्टर्स, पुस्तक प्रदर्शन, ज्ञानपीठ विजेत्यांचे फोटो व त्यांच्या साहित्याचे प्रदर्शन व भाषणांचा समावेश होता.

मराठी भाषा टिकवायची असेल, तर भाषेविषयी अस्मिता असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन करून हनुमंत महाबळ यांनी मराठी भाषेला २००० वर्षांपूर्वीचा इतिहास कथन केला. तसेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली.

हरिश्चंद्र भिसे म्हणाले, मराठी भाषा ही दासीप्रमाणे मंत्रालयाच्या बाहेर उभी आहे. मराठी भाषेत दर्जेदार असे वाङ्मय असून, मराठी भाषेला अभिजात मिळेलच, असा विश्वास व्यक्त केला. यासाठी आपण भाषेचा आदर करावयास शिकले पाहिजे, असे आवाहन केले.

यावेळी निबंध आणि गीतगायन स्पर्धेतील प्रथम तीन विजेत्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचा ग्रंथालय विभाग व कळणे मक्तद्वार ग्रंथालयाच्यावतीने भरविलेल्या ग्रंथ प्रदर्शनास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी प्रा. दिलीप बर्वे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप बर्वे, आभार विमल माजिक यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (वार्ताहर)